UGC CARE LISTED
ISSN No. 2394-5990

# इतिहासाचार्य वि. का. राजवाडे मंडळ, धुळे
## या संस्थेचे त्रैमासिक

# ।। संशोधक।।

**पुरवणी अंक २८ – मार्च २०२४ (त्रैमासिक)**

- **शके १९४५**
- **वर्ष : ९२**
- **पुरवणी अंक : २८**

**संपादक मंडळ**

- प्राचार्य डॉ. सर्जेराव भामरे
- प्राचार्य डॉ. अनिल माणिक बैसाणे
- प्रा. डॉ. मृदुला वर्मा
- प्रा. श्रीपाद नांदेडकर

**अतिथी संपादक**

- प्राचार्य डॉ. सुनील हेळकर
- प्रो. डॉ. प्रेमचंद गायकवाड
- प्रा. डॉ. गोवर्धन दिकोंडा

**✷ प्रकाशक ✷**

**श्री. संजय मुंदडा**

कार्याध्यक्ष, इ. वि. का. राजवाडे संशोधन मंडळ, धुळे ४२४००१
दूरध्वनी (०२५६२) २३३८४८, ९४२२२८९४७१, ९४०४५७७०२०
Email ID : rajwademandaldhule1@gmail.com
rajwademandaldhule2@gmail.com

**कार्यालयीन वेळ**

सकाळी ९.३० ते १.००, सायंकाळी ४.३० ते ८.०० (रविवारी सुट्टी)

अंक मूल्य रु. १००/-
वार्षिक वर्गणी (फक्त अंक) रु. ५००/-, लेख सदस्यता वर्गणी : रु. २५००/-

**विशेष सूचना :** संशोधक त्रैमासिकाची वर्गणी चेक/ड्राफ्टने ‘संशोधक त्रैमासिक राजवाडे मंडळ, धुळे’ या नावाने पाठवावी.

**अक्षरजुळणी :** सौ. सीमा शिंत्रे, पुणे.

टीप : या नियतकालिकेतील लेखकांच्या विचारांशी मंडळ व शासन सहमत असेलच असे नाही.

# अनुक्रमणिका


१. **डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची शैक्षणिक वाटचाल व महाराजा सयाजीराव गायकवाड यांचे योगदान**

- १) श्री. पोटे विशाल छबू, २) डॉ. गिरमकर कान्हू लक्ष्मण ---------------------------- ९

२. **महाराज सयाजीराव गायकवाड यांचे शिक्षणविषयक विचार**

- डॉ. सचिन ज्ञानेश्वर मोरे ---------------------------------------------------------- १३

३. **महाराजा सयाजीराव गायकवाड यांचे सामाजिक सुधारणेतील योगदान**

- डॉ.रवींद्र पुंजाजी मते ---------------------------------------------------------- १७

४. **महाराजा सयाजीराव गायकवाड यांचे सामाजिक योगदान**

- डॉ. शितल अरविंद धरम ---------------------------------------------------------- २१

५. **महाराजा सयाजीराव गायकवाड यांचे कृषी क्षेत्रातील योगदान**

- डॉ. रोडगे कैलास दादासाहेब ---------------------------------------------------------- २५

६. **महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी केलेल्या सामाजिक सुधारणा**

- प्रा. रमेश नरसिंग थोरात ---------------------------------------------------------- २८

७. **महाराजा सयाजीराव गायकवाड यांचे कृषी क्षेत्रातील योगदान एक ऐतिहासिक अभ्यास**

- प्रा.डॉ. म्हस्के नारायण कारभारी ---------------------------------------------------------- ३१

८. **महाराजा सयाजीराव गायकवाड यांचे शैक्षणिक क्षेत्रातील योगदान एक ऐतिहासिक अभ्यास**

- प्रा.डॉ. मृणाल गुलाबराव भोसले ---------------------------------------------------------- ३४

९. **महाराजा सयाजीराव गायकवाड यांची स्त्री शिक्षणविषयक भूमिका**

- प्रा.ज्ञानेश्वर बाळासाहेब पादर ---------------------------------------------------------- ३७

१०. **महाराज सयाजीराव गायकवाड एक द्रष्टा युगपुरुष**

- प्रा.डॉ.बाळासाहेब नानासाहेब देवकाते ---------------------------------------------------------- ४०

ISSN No. 2394-5990

# महाराजा सयाजीराव गायकवाड यांची स्त्री शिक्षणविषयक भूमिका

**प्रा.ज्ञानेश्वर बाळासाहेब पादर**
सहाय्यक प्राध्यापक
कला, वाणिज्य व विज्ञान महविद्यालय,
सोनई, ता. नेवासा जि.अहमदनगर.
मो. ९९६०९५०२३६
मेल. : dnypadar@rediffmail.com

अनिष्ट रूढी, परंपरा, चालीरीती, प्रथा यात भारतीय समाज खितपत पडलेला होता. १८ व्या १९ व्या शतकात स्त्रियांची स्थिती तर आणखीनच बिकट होती. युरोपमध्ये प्रबोधनाची चळवळ सुरु झाली आणि अंधारात खितपत पडलेले युरोप आज संपूर्ण जगात झगमगताना दिसतो. तशाच पद्धतीने सुधारणा करण्याचे काम केले ते म्हणजे भारतीय समाज सुधारकांनी. भारतात अनेक समाज सुधारकांचा उदय झाला. आणी एक प्रकारे समाज प्रबोधनाची चळवळ सुरु करून अंधारात खितपत पडलेल्या भारतीय समाजाला प्रकाशात आणण्याचे काम त्यांनी केले. सयाजीराव गायकवाड हे जोपर्यंत बडोदा संस्थानात येत नव्हते, म्हणजेच त्यांचे दत्तक विधान जोपर्यंत झाले नव्हते, तोपर्यंत ते शिक्षणापासून वंचित होते. दत्तक विधान पूर्ण झाल्यानंतर महाराज बडोद्यात दाखल झाले आणि शिक्षण घेण्यास सुरुवात केली. खरंतर खरंतर शिक्षण हे वाघिणीचे दूध म्हणून ओळखले जाते. शिक्षण घेतल्यामुळेच महाराजांना एक वेगळी दिशा मिळाली आणि नंतरच्या काळात आपल्या संस्थानात देखील शिक्षणासाठी मोठ्या प्रमाणात प्रयत्न केले. सयाजीराव गायकवाड यांचे शिक्षण जरी कोणत्याही औपचारिक विषयाप्रमाणेच झालेले नसले तरी त्यांचे व्यक्तिमत्व त्यांचे निर्णय क्षमता त्यांचे विचार मात्र एखाद्या विद्यापीठात शिक्षण घेणाऱ्या माणसापेक्षा कमी नव्हते. म्हणूनच तर महाराजांनी बडोदा संस्थानात सक्तीचे आणि मोफत शिक्षण सुरू केलेले पाहायला मिळते. एखाद्या संस्थानात प्राथमिक शिक्षण सक्तीचे करणारे बडोदा हे संस्थान भारतात पहिले संस्थान होते. केवळ सक्तीचे शिक्षण सुरूच केले नाही तर त्याची अंमलबजावणी देखील सक्तीनेच केली. म्हणजेच खऱ्या अर्थाने शिक्षणाची कंबर महाराजांनी कसलेली येथे पाहावयास मिळते. स्त्रियांना रूढी, परंपरा, चालीरीतीया विळख्यातून बाहेर पडण्याचा एकमेव मार्ग म्हणजे शिक्षण होय हे महाराजांनी ओळखले आणि पुरुष शिक्षणाबरोबरच स्त्री शिक्षणाला देखील महाराजांनी विशेष प्रयत्न केले. हा विचार त्याच माणसाच्या डोक्यात येऊ शकतो ज्याचे विचार स्त्री स्वातंत्र्यवादी वृत्तीचे असतात. महाराजांची नेहमीच भूमिका ही स्त्री स्वातंत्र्यवादी स्वरूपाची राहिलेली दिसते. महाराजांनी आपल्या संस्थानात केवळ औपचारिक शिक्षणाच नाही तर मेकॅनिकल इंजिनिअरिंग, चित्रकला, शिल्पकला, सुतारकाम रंगकाम, स्थापत्य कला, स्थापत्य शास्त्र, वस्तू शास्त्र यासारखे विषय देखील शिकवत होते. म्हणजेच शिक्षणात विशेष प्राधान्य दिले.

प्रस्तुत शोधनिबंधामध्ये महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी सामाजिक सुधारणा चळवळ घडवून आणताना आपल्या संस्थानात सुरु केलेल्या सक्तीच्या शिक्षण योजने बरोबरच स्त्री शिक्षण विषयक भूमिकेचा अभ्यास करणार आहोत.

**स्त्री शिक्षण :**

राष्ट्राची अर्धीशक्ती ही स्त्री असते घरात, राज्यात, राष्ट्रात स्त्रियांना देखील पुरुषाप्रमाणेच स्थान असते कारण पुरुषाच्या खांद्याला खांदा लावून संसार स्त्री देखील करत असते. मग सर्व अधिकार पुरुषांनाच का? म्हणून पुरुषाबरोबरच स्त्रियांना देखील शिक्षणाचा हक्क मिळवून देणारे, स्त्रियांच्या हक्काची बाजू घेणारे, विचार आपल्याला सयाजीराव गायकवाड यांचे बघावयास मिळतात. महाराजांनी १८८५ च्या जाहीरनाम्यानुसार आपले शैक्षणिक धोरण ठरविताना स्त्रियांच्या क्षमताचा विकास, त्यांची रूढी परंपरा, चालीरीती यातून मुक्तता कशी करता येईल याचा विचार केलेला पाहावयास मिळतो. महाराजांनी सुरू केलेले मोफत शिक्षणाची योजना ही केवळ पुरुषांनाच नाही तर स्त्रियांना देखील होती. मुलांबरोबरच मुलींनी ही त्याचा लाभ घेतलाच पाहिजे अशी त्यांची अपेक्षा होती. कारण शिक्षण हा कोणा एकाचा अधिकार नाही तर तो प्रत्येकाचा आहे स्त्री, पुरुष, स्पृश्य-अस्पृश्य असा त्यामध्ये भेदभाव नको. शाळेत प्रवेश घेण्यासाठी मुलींचे वय सात ते बारा वर्षे असे निश्चित केले होते मात्र इ. स. १९१३ मध्ये या वयाच्या अटी मध्ये बदल करून मुलींसाठी वयाची अट सात ते बाराअशी करण्यात आली.

सात ते दहा वयाची अट असताना शाळेमध्ये प्रवेश घेणाऱ्या मुलींची संख्या कमी होती. या वाढीव अटीचा फायदा मुलींना व्हावा, शिक्षणातील मुलींची संख्या वाढली पाहिजे असा उदात्त हेतू महाराज सयाजीराव गायकवाड यांचा पाहावयास मिळतो. शेतकरी घरातील मुली शिक्षण घेतील हा थोडा गंभीर विषय होता. गैरहजर असल्यास दंडाची तरतूद केली होती. शेतात जर काम असेल किंवा शेतीच्या कामाच्या हंगामात गैरहजरित मात्र सूट द्यावी लागत होती. त्या काळात स्त्री शिक्षणासाठी शैक्षणिक उपस्थिती वाढवावी यासाठी महाराजांना काही कठोर निर्णय घ्यावे लागल्याचे दिसून येते. एकंदरीत विचार करता असे दिसून येते की प्रसंगी शेतकऱ्यांची नाराजी सहन करून शिक्षणाला प्राधान्य महाराजांनी दिलेले बघावयास मिळते. इ. स. १९०६ सालच्या कायद्याने संस्थानातील शाळांच्या संख्येत वाढ झाल्याने मुला मुलींच्या संकेत देखील वाढ झाली परंतु या सर्व शाखा समिश्र शाळा होत्या. मुले मुली एकाच ठिकाणी शिक्षण घेत हे अनेकांना पटणारे नव्हते. त्यामुळे मुलींची शाळेतील संख्या ही कमी असल्याचे दिसून येत होते. म्हणून इ. स. १९१५ साली मुला- मुलींच्या शाळा स्वतंत्र केल्या. मुलींसाठी स्वतंत्र शाळेची निर्मिती करण्यात आली त्यामुळे मुलींचे शाळेतील उपस्थिती वाढली. मुलींची शाळेतील उपस्थितीसाठी ही कल्पना यशस्वी ठरली महात्मा ज्योतिबा फुले यांनी पुण्यात मुलींची पहिली स्वतंत्र शाळा सुरू केली. मुलींचे शिक्षणावर भर देण्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे बुद्धिवान आणि सुशिक्षित आईची करडी नजर, प्रेमळ देखरेख लहान मुलांच्या मनाची जडणघडण करणारे एक महत्त्वाचा घटक असतो. अशी भूमिका महाराजांची पहावयास मिळते. केवळ प्राथमिक शिक्षणाची नाही तर माध्यमिक, महाविद्यालयीन स्तरावरील शिक्षणाच्या सुविधा उपलब्ध करून देण्याचे काम महाराज सयाजीराव गायकवाड यांनी केले. मुलींची उपस्थिती वाढविण्यासाठी विशेष गुणवत्ता शिष्यवृत्ती योजना देखील राबवली. महाराजांनी मुलीच्या अभ्यासक्रमामध्ये केवळ पुस्तकी ज्ञानाचाच नाही तर भरतकाम, चित्रकला, पाकशास्त्र, गृह अर्थशास्त्र, संस्कृत, विणकाम, यांचा समावेश केला . म्हणजेच पुस्तकी ज्ञानाबरोबरच त्यांना त्यांच्या आयुष्यात संसार करताना वरील शिक्षणाचा उपयोग होणार होता. संपूर्ण घर ही एक स्त्री चालवत असते तर त्यासाठी शिक्षणात गृह अर्थशास्त्राचा समावेश केला. नऊ ते दहा वर्षा पर्यंतच्या मुलींनां शिवणकाम सक्तीचे केले होते. शिवन कामात मुख्यध्यापकासह सर्व शिक्षकाने लक्ष घालण्याचे आदेश दिलेले होते. म्हणजे स्त्रियांना त्यांच्या संसार उपयोगी शिक्षणात कोणतीच तडजोड न करण्याचा हा प्रयत्न दिसून येतो. शिवणकाम, भरतकाम, पाकशास्त्र या विषयाबाबतीत मुख्याध्यापिकेने विशेष लक्ष घालावे. म्हणजेच त्या कालखंडात महाराजांनी सुरू केलेले शाळेत स्त्री केवळ फक्त शिक्षणच नाही तर संपूर्ण कुटुंब कसे चालवता येईल याचे शिक्षण घेत होती. बरे तेवढ्यावरच न थांबता संगीत, आरोग्य, व्यायाम अशा विषयाचे शिक्षण देखील मुलींना दिले. ज्यामुळे स्त्रियांचे आरोग्य निरोगी राहावे, त्यांना व्यायामाची आवड निर्माण व्हावी. हे फक्त शिक्षण म्हणून किंवा सध्याच्या शिक्षण प्रणाली प्रमाणे केवळ कागदावर पूर्ण करून न घेता त्यांच्याकडून प्रत्यक्ष कृतीतून प्रात्यक्षिक शिक्षण मुलींना देत. यासाठी कुशल शिक्षक प्रत्येक मुलीच्या शाळेमध्ये नेमलेले होते. देशी खेळांसाठी वेळापत्रका मध्ये स्वतंत्र तासाची तरतूद केली होती. भारतातील देशी खेळ हे आरोग्यासाठी निश्चितच चांगले असतात भारतीय संस्कृतीचे जतन याबरोबर मुलींचे आरोग्याचा विकास हा या मागचा हेतू असल्याचे आपणास पहावयास मिळते. मुलींची प्रकृती उत्तम राहावी म्हणून शारीरिक शिक्षणावर विशेष लक्ष केंद्रित केल्याचे दिसते. मुलींसाठी प्राथमिक शिक्षणाबरोबरच माध्यमिक शिक्षणाला देखील प्राधान्य दिले. मुलींच्या उच्च शिक्षणासाठी तरतूद केली. उच्च शिक्षणासाठी बडोदा कॉलेजच्या स्थापनेनंतर महाराजांनी १८८२ ला सुरू झालेल्या बडोदा कॉलेजचे सलग्निकरण मुंबई विद्यापीठाची करून १८९० मध्ये बडोदा कॉलेजमध्ये गृह विज्ञान शास्त्र अभ्यासक्रम सुरू केला. मुलींच्या उच्च शिक्षणासाठी तरतूद केली शिक्षकांसाठी फीमेल ट्रेनिंग कॉलेज काढले तसेच जेन्डस ट्रेनिंग कॉलेज देखील सुरू केले. मुलींना शिक्षणासाठी तथा शिक्षक, शिक्षिका, प्रशिक्षक मिळावे व ते आपल्याच देशात निर्माण व्हावेत म्हणून होतकरू स्त्रियांना अमेरिकेत शिक्षणासाठी पाठवण्यात सुरुवात केली. याचे उदाहरण म्हणजे राधाबाईपोवार यांना अध्यापन शास्त्राच्या शिक्षणासाठी अमेरिकेच्या टीचर्स कॉलेज युनिव्हर्सिटीत पाठवण्यात आले होते. म्हणजेच अमेरिकेसारख्या देशातील शिक्षक आपल्या संस्थानात निर्माण व्हावेत व आपल्या संस्थानातील शिक्षणाचा दर्जा सुधारावा हा त्यामागचा उद्देश होता. महाराजांनी आपल्या ६३ वर्षाच्या आयुष्यात २४ सफरी केल्या त्याचा फायदा त्यांनी शिक्षण विषयक निर्णय घेताना करून घेतल्याचे दिसून येते.

बडोदा संस्थान हे ब्रिटिशांच्या अधिन असणारे होते ब्रिटिशांच्या अधीन असून देखील संस्थानात अशा अनेक कल्याणकारी योजना राबविण्यात त्यांना अनेक अडचणी आल्या परंतु अशा योजना राबविताना त्यामागचा उद्देश राज्याचे आणि प्रजेचे हित जोपासणे हाच होता. प्रजेचे हित शिक्षणातूनच साधता येते हे महाराजांना माहीत होते म्हणून महाराजांनी आपल्या संस्थानात शिक्षण सक्तीचे केले. हेसक्तीचे शिक्षण केवळ मुलांनाच नाही तर मुलींना देखील केले. स्त्री शिक्षणासाठी

देखील विशेष प्रयत्न महाराजांनी केले स्त्रियांसाठी स्वतंत्र शाळेची निर्मिती, माध्यमिक शाळेची निर्मिती, कॉलेजची निर्मिती, फीमेल ट्रेनिंग कॉलेजची स्थापना तसेच त्यासाठी शिष्यवृत्ती देण्याची तरतूद महाराजांनी केली एवढेच नाही तर संसार उपयोगी शिक्षण महाराजांनी स्त्रियांना शाळेतूनच दिले. स्त्रीयांसाठी प्रोढ शिक्षण वर्गाची सुविधा देखील महाराजांनी केल्याचे दिसून येते. स्त्री शिक्षणाचा उदात्त हेतू, स्त्री शिक्षणाची तळमळ, यातून आपणास पहावयास मिळते.

**संदर्भ ग्रंथसूची :**

१. भांड बाबा, सयाजीराव गौरवगाथा, महाराष्ट्र शासन, २०१७
२. गाठाळ एस.एस., आधुनिक महराष्ट्राचा इतिहास, कैलाश पब्लिकेशन्स, औरंगाबाद.
३. लेले भालचंद्र चिंतामणी, सयाजीराव गौरवग्रंथ वैभव प्रेस गिरगाव मुंबई.
४. गायकवाड रा.ज्ञा. महाराष्ट्रातील सामाजिक सुधारणेचा इतिहास, मेहता पब्लिशिंग हाउस पुणे.
५. पवार निबाजीराव , जेव्हा गुराखी राजा होतो, सयाजी प्रकाशन नाशिक.
६. भांड बाबा, सयाजीराव गायकवाड आणि शाहू छत्रपती, महाराजा सयाजीराव गायकवाड संशोधन व प्रशिक्षण संस्था गांधीनगर.
७. पगार अेकनाथ, महाराष्ट्राचे शिल्पकार महाराजा सयाजीराव गायकवाड महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई.
८. भांड बाबा, लोकपाळ राजा सयाजीराव, साकेत प्रकाशन औरंगाबाद

■■■